‘Research Journey’ International Multidisciplinary E- Research Journal
Special Issue I– Emerging Trends & Issues in Research & Development
Global Impact Factor – 0.565 (2014) & 0.676 (2015)
ISSN : 2348-7143 (Online)
Jan-March- 2016

# स्त्रीवादी साहित्य आणि चळवळ

प्रा. डॉ.अरूणा अर्जुन मोरे
इतिहास विभाग प्रमुख
दौंड कॉलेज, दौंड, जि. पुणे
मो. नं. ९८५००१४५७३
ईमेल:- arunamore1957@gmail.com

‘‘ज्या परमेश्वराने सृष्टी उत्पन्न केली. त्यानेच स्त्री पुरूष निर्माण केले तरी सर्व प्रकारचे साहस दुर्गुण स्त्रियांचेच अंगी वसतात किंवा जे अवगुण स्त्रियांचे अंगी आहेत तेच पुरूषात आहे किंवा नाहीत हे अगदी स्पष्ट करून दाखवावे याच हेतूने हा लहानसा निबंध मी माझ्या सर्व देशभगिनींचा अभिमान धरून रचला आहे. यात अमुकच जाती किंवा कुल याकडे माझे मुळीच लक्ष नाही, स्त्री पुरूषाची तुलना आहे.’’

वरील अवतरण आहे १८८२ मध्ये व–हाडातील ताराबाई शिंदे यानी लिहीलेल्या ‘स्त्री पुरूष तुलना’ या ग्रंथातील. ताराबाईंचा हा ग्रंथ म्हणजे ‘भारतातील स्त्रीवादाचा पाया’ आहे असे म्हटल्यास वावगे ठरू नये.

ताराबाईच्या विवेचनातील ‘दहा सवाल’ म्हणजे स्त्रियांवरील अन्यायाविरूध्दचा विद्रोही जाहिरनामाच होता. १९व्या शतकाच्या संदर्भात चमत्कार वाटावा असा हा स्थिती बदल होता. फुल्यांचा अपवाद वगळता कोणा पुरूष विचारवंताकडून वा, तत्कालीन पुरोगामी चळवळीकडून ताराबाईंच्या ग्रंथाला अनुकूल प्रतिसाद मिळाला नाही. तरीही बहुजन समाजातील स्त्रीच्या पुरोगामी समतावादाचे प्रतिक म्हणून ताराबांईचा उल्लेख करता येईल.

आज स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव जवळ आला तरी प्रश्न असा आहे की, आपल्या देशातील समाजात स्त्रीला समान समाज घटक म्हणून समाजात कुटुंबात तिचा स्विकार झाला आहे का? अनुभव असा आहे की २१ व्या शतकात पदार्पण करणाऱ्या जगात आपल्या देशात आजही स्त्रीला गौणस्थानच आहे. ही परिस्थिती बदलण्याच्या दृष्टीने भारतातील सर्व स्त्री संघटना, स्त्रीवादी विचारवंत, स्त्रीवादी साहित्यीक आपआपल्या परीने प्रयत्न करताहेत. भारतीय स्त्रीवादाची आणि स्त्री मुक्ती लढयाची वैचारिक पार्श्वभूमी १९ व्या शतकानेच करून ठेवली आहे.

१९व्या शतकात महाराष्ट्रात स्त्री विषयक बरेच विचारमंथन घडून आले. १९ व्या शतकातील लोकहितवादींची ‘शतपत्रे’ आणि फुले दाम्पत्यांचे स्त्री–शिक्षणकार्य या दोन गोष्टीमुळे १९व्या शतकाच्या मध्याला या विचारमंथनाला चांगली गती मिळली होती. १९ व्या शतकात दादोबा पांडुरंग, बाबा पदमनजी, विष्णू शास्त्री पंडित, भांडारकर, रानडे, मलबारी, पंडिता रमाबाई, राजाराम शास्त्री भागवत, आगरकर, हरिभाऊ आपटे, धोंडो केशव कर्वे, इत्यादी विचारवंतानी सुधारणावादी विचारांची भर घातली.

१९व्या शतकातील स्त्रीवादी सुधारणा चळवळीत पुरूषांचा पुढाकार होता. अभिजन आणि बहुजन अशा दोन्ही प्रकारचे स्त्री विषयक सुधारणावादाचे प्रयत्न गौरवास्पद होते. असे जरी असले तरी स्त्री मुक्ती अथवा स्त्रीवादाचे भारतातील खरे कर्ते सुधारकपणाचा मान अर्थातच महात्मा फुल्यांकडेच जातो. म्हणूनच ...

**"करू पाहिल नमनं ज्योतीबाला**

**ज्यानं स्त्री मुक्तीला जन्म दिला "**

अस स्त्रीवादयांकडून गौरवाने म्हटले जाते. २०व्या शतकाच्या पूर्वाधात डॉ. बाबासाहेब आंबेडकर महात्मा गांधी व राममनोहर लोहिया यांचे स्त्री संबंधी कार्य महत्वपूर्ण मानले जाते.

१९७० च्या दशकात भारतात स्त्रीवादी विचारसरणीचा उगम झाला. त्यापूर्वी १९६० च्या दशकात पाश्चात्य देशात डाव्या चळवळीतून एका कट्टर स्त्रीवादाचा उदय झाला. १९७४ साली 'स्टेटस ऑफ वुमेन कमिशंन' ने **'समानतेच्या दिशेने'** हा स्त्रियांच्या सदयस्थितीवरील अहवाल बाहेर आणला. याच अहवालाने भारतीय स्त्रीवादाला औपचारिक जन्म दिला असे म्हटले जाते.

१९७५ हे आंतरराष्ट्रीय महिला व वर्ष म्हणून युनेस्कोने जाहीर केले. याचकाळात पुण्यात व मुंबईत पुरोगामी स्त्री संघटना अस्तित्वात आल्या. स्त्रीवर होणा—या अन्याय, अत्याचार, हिंसेवर याच चळवळीने लक्ष केंद्रीत केले. आंतरराष्ट्रीय महिला वर्षात जेव्हा नव्या स्त्रीवादी जाणीवेचा उदय झाला तेव्हा प्रस्थापित विकास नितीची कोंडी, शासन संस्था, विकास प्रक्रियेत स्त्रियांचे परिघाबाहेर फेकले जाणे या परस्पर संबंधाची चर्चा सुरू झाली. त्यातून स्त्रिया त्यांचे घरातले, घराबाहेरचे काम यावर प्रकाश टाकला गेला.

सुलभा ब्रहमे, मालती गाडगीळ, मॅथ्यू, मैत्रेयी कृष्णराजा, गेल ऑमव्हेट या सर्व स्त्रीवादी विचारवंतानी या काळात लिखाणाद्वारे, भाषणाद्वारे सामाजिक क्षेत्रात स्त्रीवादी चळवळीचे कार्य केले. राजकीय क्षेत्रात मृणाल गोरे, अहिल्या रांगणेकर, विदया बाळ यांनी स्त्री चळवळीत स्त्री हक्कासाठी लढा सुरू केला. प्रीती करमरकर—नारी समता मंच, नीलम गो—हे—स्त्री आधार केंद्र, विदयुत भागवत—माया पंडित—स्त्री अभ्यास केंद्र (पुणे विद्यापीठ—शिवाजी विद्यापीठ) या हा स्त्री—पुरूष समानता जाणीवेचा वारसा पुढे नेत आहे. रिंकू पाटील ते अमृता देशपांडेची एकतर्फी प्रेम प्रकरणातून हत्या प्रकरणे, जळगाव—सातारा वासनाकांड, कौठेवाडी बलात्कार प्रकरण अथवा हुंडा, लैंगीक शोषण स्त्री अत्याचाराच्या संदर्भात जनजागृती, संघर्ष करून महिला सुरक्षिततेचे कायदे सरकारला मंजूर करण्यास भाग पाडले. त्याचे काम अदयापही जोरात चालू आहे.

याचवेळी मराठी साहित्यात १९७५ ते १९८५ या कालखंडात 'साठोत्तरी वाङ:मयीन प्रवाह जो निर्माण झाला या काळात स्त्री साहित्याची भरभराट झाली. स्त्री साहित्य म्हणजे स्त्री भावना व जाणीवा, स्त्री जीवानुभव केंद्रबिंदू मानून केलेले लेखन असे एक प्रमाण मानावे लागेल १९७५ नंतरच्या स्त्रीवादी चळवळीचा परिणाम साहित्यावर पडलेला दिसतो. शिक्षणाचा प्रसार, अन्यायाविरूध्द चीड, स्वक्षमताची जाणीव व विकास उदारमतवादी धोरण हे स्त्रीवादी साहित्य निर्मीतीचे प्रेरक घटक आहेत. केवळ स्त्रियांनी स्त्री मुक्तीसाठी मांडलेला विचार म्हणजे स्त्री वादी साहित्य असे नसून लेखन करणारी व्यक्ती स्त्री असो वा पुरूष असो स्त्री जीवन स्वत: अनुभवणारी असो अथवा न अनुभवता सहानभूतीने लेखन करणारी असो परंतू त्या व्यक्तीच्या लेखनातून स्त्री जीवन तिच्या भावभावनांचा अविष्कार झालेला असेल तिच्या वर्तमान काळातील स्थितीचा व भविष्य काळातील अपेक्षांचा विचार केला. जात असेल तर त्या साहित्यास "**स्त्री वादी साहित्य**" म्हटले जावे असा एक नवीन विचार पुढे येत आहे. स्त्रीवादी साहित्याबाबत विजया राजाध्यक्ष म्हणतात. "स्त्री मुक्ती म्हणजे पुरूषांशी

ISSN : 2348-7143 (Online)
Jan-March- 2016

भांडण नव्हे. स्त्री साहित्यातून दिसणारी मुक्ती ही मानव म्हणून हवी आहे. कोंडी सर्वाचीच होते. ती कमी करण्याचा प्रयत्न करायला हवा. वादापेक्षा संवाद साधणे महत्वाचे आहे. व नेमके हेच स्त्री साहित्यातून पहायला मिळते.

साठोत्तरीच्या काळात शिकलेल्या, अर्थप्राप्ती करणा—या, नागरी जीवन जगणाऱ्या महिलांनी स्त्री मनातील भावभावना भावनेचा कोंडमारा स्त्री जीवनाला काचत असलेली बंधने याविषयी लेखन वाचन करण्यास सुरूवात केली होती. यातूनच स्त्री, ललना, स्नेहप्रभा, माहेर, प्रपंच, गृहलक्ष्मी, रागिणी, अनुराधा, प्रियवंदा, रोहिणी, मानिनी, गृहशोभा इत्यादी नवनवीन मासिकांची निर्मिती झाली. यातूनच स्त्री साहित्याची वाढ झाली. ती संख्यात्मक की गुणात्मक? हा प्रश्न तूर्तास बाजूला ठेवला तरी यातून स्त्री समस्या मांडण्यात आल्या परंतू केवळ नागरी अथवा सुशिक्षित महिलांच्या जीवनातील समस्यांना वाचा फोडणे म्हणजे व्यापक स्त्री साहित्य नव्हे. तर नागर, ग्रामीण, पददलित, कामगार, भटके विमुक्त, फिरस्ते, शिक्षित, अशिक्षित, रूढी परंपरेला चिकटलेल्या, अंधश्रध्दा मानणाऱ्या, आधुनिक विचारवादी अशा अनेक पातळीवरील स्त्री समस्यांना वाचा फोडणे व त्यातून होणारी मानहानी मानव म्हणून त्यांना अपेक्षित असलेले स्वातंत्र्य, समान संधी यांचे चित्रणही याच काळात रंगविण्यात आले.

स्वातंत्र्यपूर्व काळातील अनेक साहित्यीकांनी आपल्या नाटक,कथा , कादंबऱ्यातून स्त्रियांसंबधीच्या सामाजिक प्रश्नाला आपल्या साहित्यातून वाचा फोडलेली दिसते. उदा. गोविंद बल्लाळ देवल यांचे ‘शारदा’ नाटक होय. या नाटकातून त्यांनी बालाजरठ विवाहाचा निषेध केला. वा. ना. डोंगरे (म्हातारचळ १८८७), पु. बा. डोंगरे (पती विटंबना — १८८५), मो. वि. शिंगणे (कन्या विक्रय — १८९५)या नाटकानी बालाजरठ विवाहाबाबत आणि हुंडयाच्या दुष्टचालींबाबत लोकांच्या विचारांना चालना दिलेली होती.

श्रीपाद कृष्ण कोल्हाटकर वीरतनया (१८९४) यातून विधुरविवाहाची आवश्यकता पटवून दिलेली होती. हल्लीच्या स्त्री स्वातंत्र्याच्या काळात स्त्रियांवर बलत्कार व फसवणुकीचे प्रसंग येणे अपरिहार्य आहे. त्यातून ‘‘मायाविवाह’’ (१९२८) चा जन्म झालेला दिसतो. ह. ना. आपटेंचे ‘संतसखू, राम गणेश गडकरीचे ‘एकच प्याला’, ‘प्रेमसंन्यास’ यातून आदर्श स्त्रीत्वाची पण बंड करून उठणारी सिंधू, तसेच प्रेमसंन्यास मधून विधवांच्या असहाय्य जीवनाचे चित्र रंगविले आहे. मामा वरेरकरांचे ‘हाच मुलाचा बाप’ यातून हुंड्याचा ज्वलंत प्रश्न मांडला आहे. वासुदेव वामन भोळ यांच्या ‘अरूणोदय’ व ‘सरलादेवी’ या नाटकातून विवाहापूर्वी कौमार्य भंग होऊन माता बनलेल्या स्त्रियांचा नाजूक प्रश्न सूक्ष्म स्वभाव चित्रणाद्वारे मांडले आहे. वि.च. बेडेकर यांचे ब्रहमकुमारी, अनंत हरि गद्रे यांचे ‘कुमारी १९३१’ या नाटकातून प्रेमविवाह, विधवाविवाह तसेच वेश्या विवाहाला मान्यता इत्यादी सामाजिक प्रश्न मांडले आहेत. र. धो. कर्वे यांनीही ‘न्यायाचा शोध’ यातुन पुरूषाने नसबंदी करावी या मताचा पुरस्कार केलेला दिसतो.

असे असले तरी काही वेळा या साहित्यातुन साकारलेली स्त्री प्रतिमा ही पारंपारिक होती. आज्ञाधारक नम्र, शालीन, कुलीन अशा विविध स्त्री आदर्शाची होती. १९३२ मध्ये ‘विभावरी शिरूरकर’ यांनी स्त्रियांच्या कोंडलेल्या भावनांना प्रथम वाचा फोडण्याचे कार्य केले. मालतीबाई बेडेकरांना ‘विभावरी शिरूरकर’ या टोपण नावानेच लिखाण करावं हे सत्य नाकारून चालणार नाही. ‘कळ्यांचे नि:श्वास’, शबरी, ‘हिंदोळ्यावर’ यामध्ये स्त्रियांच्या अंत:करणातील अनेक कल्लोळ

त्यांनी मोठ्या धीटपणे रंगविले. स्त्रीची दासी अथवा देवता ही प्रतिमा नाकारून तिला 'माणूसपण' बहाल करण्याचा प्रयत्न मालतीबाईंनी प्रथम केला. नवसाहित्यातील स्त्री पहाताना गंगाधर गाडगीळ, जयवंत दळवी यांची नावे घ्यावीच लागतात.

आधुनिक कवितेत भा.रा.तांबे – प्रणयप्रभा, बा.भ. बोरकर, माधव ज्यूलियन यांच्या कवितेत रंगविलेली स्त्री रूपे तशी पारंपारिकच आहेत. आज नवकवयित्री पारंपारिक स्त्री प्रतिमा नाकारून व्यक्ती म्हणून आपली स्वत:ची नवी प्रतिमा सिध्द करतात. कवयित्री पद्मा गोळे, इंदिरा संत,अनुराधा पोतदार, शांता शेळके, अरूणा ढेरे यांच्या कवितांतून या विचारांचे प्रतिबिंब दिसते. जीवन व्यापारात समानतेच्या नात्याने सहभागी होऊन एकमेकांबद्दल विश्वास निर्माण करणे हा दृष्टिकोन स्त्रीवादी कवितेत दिसतो यशिवाय स्त्री पुरूष सबंधातील बाईच्या जीवनातील दु:खाचे ही त्यात दर्शन घडते या नवकवयित्रीच्या कविता अधिक डोळस आहे स्त्री ही केवळ भोगवस्तु आहे ही कल्पना त्यात नाकारलेली आहे सर्व मनस्ताप दु:ख गिळून जीवन संसाराला सामोरे जाणा–या स्त्री मनाचा वेध आसावरी काकडे, प्रभा गणोरकर, अनुराधा पाटील, अरूणा ढेरे ,अश्विनी गुरव याच्या कवितेत दिसतो स्त्री जीवनाची दु:खे उलगडून दाखवताना स्त्री मधील सनातन मनाच्या युगानुयुगे भोगत आलेलया दु:खाची जाणीव या कवितेत आढळते

दलितांमध्ये दलित असणारी स्त्री ही दलित साहित्याने दिलेली नवजागृतीची जाणीव व विचार करायला लावणारी आहे त्यात शांताबाई कांबळेचे 'माझ्या जन्माची चित्तरकथा', मलिका अमर शेखचं 'मला उध्वस्त व्हायचय' विमल मोरेचे 'तीन दगडाची चूल', नामदेव कांबळेच्या 'राघववेळची नायिका' ही साहित्य निर्मिती महत्वाची आहे

मराठी स्त्रीवादी साहित्यातही मराठी स्त्री आत्मचरित्रेही महत्वाची आहेत 'स्व' चा शोध घेताना प्रसिध्द साहित्यीकाची पत्नी म्हणून वावरताना आपल्या अंर्तगुणाचा विकास होऊ शकला नाही हया कलावंताला फुलविण्याठी आपण आपल्या व्यक्तीमत्वाचा होम केला या आशयाची ''आहे मनोहर तरी'' – सुनिता देशपांडे (पु.ल.च्या पत्नी) व ''नाच गं घुमा'' माधवी देसाई (रणजित देसाईंची पत्नी) ही आत्मचरित्रे स्त्रीवादी दृष्टीकोनातून महत्वपूर्ण वाटतात. स्त्रियांच्या लेखनाला आत्मस्वर प्राप्त झाल्याची ही उदाहरणे आहेत. स्त्री मनाच्या सूक्ष्म आंदोलनाची किनार त्यात आहे. 'अजून चालतेचि वाट'–आनंदीबाई विजापुरे, 'सांगते ऐका'–हंसा वाडकर, 'स्नेहांकिता', 'स्नेह'– प्रभा प्रधान, ' जेव्हा माणूस' जागा होतो' – गोदावरी परूळेकर ही आत्मचरित्रेही स्त्रीवादी साहित्य समीक्षेस पात्र ठरणारी आहेत.

याचबरोबर विजय तेंडुलकरांच्या 'शांतता कोर्ट चालू आहे' किंवा सध्या गाजत असलेले 'कुसुम मनोहर लेले' ही सर्व स्त्रीवादी नाटके आहेत. स्त्रीवर होणा–या अन्याय, अत्याचार यांना किंवा स्त्रियांची वर्षानुवर्षाची धगधगीत कोंडीच जणू यातून लाव्हा बनून बाहेर आलेली दिसते. कादंबरीमध्ये व कथांमध्ये गौरी देशपांडे व सानियांच्या कथांमध्ये पाश्चात्य विचारसारणीतून प्रभावित झालेली मुक्त स्त्री ची प्रतिमा परिणामकारकरित्या प्रकट होताना दिसून येते.

स्त्री प्रतिमांचे जीर्ण संकेत टाकून देऊन नव्या स्वरूपातील स्त्रीचे दर्शन मेघना पेठे, प्रिया तेंडुलकर यांच्या कथा कादंब–यातून प्रकट होते. कोणताही आडपडदा न ठेवता स्त्रीमधले माणूसपण जास्त तीव्रपणाने त्यांच्या लेखनातून प्रकट होते. या लेखिकांनी स्त्री साहित्याला निश्चितपणे वेगळे वळण दिले. अभिव्यक्तीचे नवे परिणाम दिले. तरीही हे भावविश्व उच्चशिक्षित, मध्यमवर्गीय, नागर स्त्री पुरतेच मर्यादित राहिले. समाजाच्या सर्व स्वरावरील स्त्री जातीचे प्रतिनिधीक दर्शन त्यात होऊ शकत नाही. कविता महाजन यांच्या 'ब्र' कांदबरीचा स्त्रीवादी साहित्यात आवर्जुन उल्लेख करावा लागेल.

एकंदरीत स्त्रीवादी साहित्य हे आमच्या स्त्री जाणीवा पाश्चात्य साहित्याच्या प्रभावामुळे समृध्द झाल्याने व आंतरराष्ट्रीय महिला वर्षातील स्त्री चळवळींनी अधिक समृध्द झालेले दिसते. (अपवाद–मध्ययुगीन संत कवयित्रि वाङ:मय) १८७९ मध्ये इब्सेनने आपल्या 'डॉल्स हाऊस' या नाटकात नोराच्या रूपाने स्त्री मधले माणूसपण ओळखण्याची गरज प्रथम व्यक्त केली. २० व्या शतकाच्या उत्तरार्धात परंपरागत स्त्रीत्वाच्या व पुरूषत्वाच्या परिभाषा नव्याने ऐरणीवर आल्या. आणि एकूणच समाज मुळापासून ढवळून निघाला. ही स्थित्यंतरे साहित्यात नेमकेपणाने उतरली. त्यामुळेच स्त्री लेखिकांमध्ये त्यांच्या प्रकटीकरणात काही मूलभूत बदल झाले.

पुरूषप्रधान संस्कृतीत स्त्री बंधनात आहे. ती मुक्त असायला हवी. अर्थात मुक्ती म्हणजे स्वैराचार नव्हे. 'स्व' चे आलेले हे भान आहे. शेवटी **स्त्रीवाद म्हणजे स्त्रीला स्वत:च्या शक्तीची झालेली जाणीव आहे.** एका बाजूला अन्याय, अत्याचार, शोषण याखाली दडपल्याची जाणीव आहे. तर दुसरीकडे मानवजातीच्या प्रगतीमधील स्वत:च्या सहभागाची जाणीव होत आहे. वर्ग, जात, लिंग यांचा नि:पात करून खऱ्या अर्थाने समतेवर आधारित असा समाज प्रस्थापित करण्याचा भारतीय स्त्रीवादी प्रयत्न करत आहे. भारतीय स्त्रीवाद आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतीक अशा चारही पातळीवर उभा राहू पाहत आहे. स्त्रीवादी साहित्याची त्याला जोड आहे. स्त्रीवाद जेव्हा तळागाळात, खेड्यापाड्यातील शेतकरी स्त्रीपर्यंत पोहचेल तेव्हाच स्त्रीवादी चळवळ यशस्वी होईल. साहित्यातून होणारी स्त्री ची मुक्ती असो किंवा चळवळीतून होणारी असो ती मानव म्हणून व्हायला हवी. म्हणूनच म्हणावेसे वाटते,

**''स्त्री मुक्ती लढा हा नव्हे स्वैराचार !**

**ती मागते माणूसपण मनूप्रणित झुगारून बंधन!''**

## संदर्भ ग्रंथ सूची

१) युनेस्को संपा.– समानतेच्या दिशेने – बीजींगच्या पहिल्या जागतिक स्त्री परिषदेचा अहवाल.–१९८४

२) भागवत विद्युत–स्त्रिया व त्यांचे प्रश्न. परिमल प्रकाशन पुणे.

३) रेगे शर्मिला– प्रेम व हिंसा. प्रकाशक–स्त्री अभ्यास केंद्र पुणे विद्यापीठ.–१९९२

४) भागवत विद्युत –महाराष्ट्राच्या सामाजिक इतिहासाच्या दिशेने. प्रकाशक– स्त्री अभ्यास केंद्र पुणे विद्यापीठ.

५) परदेशी प्रतिमा –भागवत विद्युत–स्त्री जीवनाची गुंतागुंत. प्रकाशक–स्त्री अभ्यास केंद्र पुणे विद्यापीठ.

६) म.सा.प. संपा.–साठोत्तरी मराठी वाङ:मयाचा इतिहास. पुणे.

७) फडके भालचंद्र–मराठी लेखिका चिंता व चिंतन. कॉन्टीनेन्टल प्रकाशन, पुणे.

८) पाटील शोभा – स्त्रियांची आत्मचरित्रे –दिशा.

९) जोग. रा. श्री. – मराठी वाङ:मयाचा इतिहास खंड ५ वा.